# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. १४९-२३** **दिनांक :- ११/०५/२०२३**

## वेश्या व्यवसाय करण्यास अल्पवयीन मुली पुरविणाऱ्या महिला वेश्यादलालावर छापा कारवाई करुन ०१ अल्पवयीन व ०१ पिडीत मुलींची सुटका - अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाची कारवाई.

दिनांक ०९/०५/२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली कि, महिला वेश्यादलाल रितु रा. उल्हासनगर, ता. कल्याण, जि. ठाणे हि वेश्याव्यवसायकरीत असुन तिचा मोबाईल क्रमांकावर पुरुष गिऱ्हाईकाने संपर्क साधला असता ती व्हॉटसअॅपव्दारे पुरुष गिऱ्हाईकांना अल्पवयीन मुलींचे फोटो पाठवुन गिऱ्हाईकाच्या सोयीनुसार कौमार्यभंग करण्यासाठी अल्पवयीन मुली पुरविते व दिनांक १०/०५/२०२३ रोजी कौमार्यभंग करण्यासाठी अल्पवयीन मुलींना घेवुन काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीतील दिल्ली दरबार इन हॉटेल/रेस्टॉरंट येथे बोगस गिऱ्हाईकास दाखवुन वेश्यागमनासाठी पुरविणार आहे.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाचे पो.नि. श्री. समीर अहिरराव यांनी कायदेशीर बाबींची पर्तता करुन बोगस गिऱ्हाईक व पंच यांचेसह दिल्ली दरबार इन हॉटेल/रेस्टॉरंट, मुंबई-अहमदाबाद महामार्ग, काशिमीरा या ठिकाणी सापळा रचुन सत्यता पडताळुन पोलीस पथकासह १६.५५ वा. छापा कारवाई केली असता महिला वेश्यादलाल १) कविता उर्फ रितु शंकरप्रजापती सिंग, वय-३० वर्ष हिने अल्पवयीन मुलींना वर नमुद ठिकाणी घेवुन येवुन १५ वर्ष, ०५ महिन्याच्या अल्पवयीन मुलीचे कौमार्यभंग करण्याच्या बोलीवर मोबदला म्हणुन मोठी रक्कम ठरवुन, बोगस गिऱ्हाईकाकडुन ठरलेली रक्कम स्वीकारल्याने तिस इतर मुद्देमालासह ताब्यात घेवुन ०१ अल्पवयीन व ०१ पिडीत मुलगी असे एकुण ०२ पिडित मुलींची सुटका करण्यात आली. सदरबाबत स.फौ. उमेश हरी पाटील यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपी १) कविता उर्फ रितु शंकरप्रजापती सिंग, वय-३० वर्ष रा. उल्हासनगर, कल्याण हिचे विरुध्द काशिमिरा पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. I ३४४/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३६६ (अ), ३७०(१), ३७०(३), ३७०(४), ३७२ अ.व्या.प्रति.अधि. १९५६ चे

कलम ४, ५ सह बालकाचे लैगिंक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम १७,१८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाचे पो. नि. श्री. समीर अहिरराव, स.फौ. उमेश पाटील, विजय निलंगे, रामचंद्र पाटील, पो.अंम. केशव शिंदे, चा.पो.हवा. सम्राट गावडे, म.पो.अंम अश्विनी भिलारे, महिला म.सु.ब. शुभांगी मोकल यांनी केली आहे.

-----oooo-----